जा क्र मसके/प्रअपां/ठेका/२६६७/2191/२०२३
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली
दिनांक :२६.०७.२०२३

# जाहीर नोटीस

मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली अंतर्गत पांगारी,रूखी, टेटवली, असोंड, गावतळे व वाकवली येथील प्रक्षेत्रावर खालिल प्रमाणे कामे करावयाची आहेत.

| अ क्र | कामाचा तपशिल |
|---|---|
| 1 | मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवलीच्या पांगारी,रूखी, टेटवली, असोंड, गावतळे, सुकदर व वाकवली विभागामध्ये डोंगराळ भागामध्ये मोठया प्रमाणावर वाढलेली ग्लिरीसिडीया झाडी झुडपे जमिनीलगत कापून नेऊन बाग स्वच्छ करणे. |

उपरोक्त प्रमाणे प्रक्षेत्रावरील कामे ठेका पध्दतीने करावयाची आहेत. कामाच्या अटी व शर्ती इत्यादी माहिती तसेच भरून दयावयाचे संमत्तीपत्र आणि दरपत्रक नमूना या कार्यालयात कार्यालयीन कामाच्या दिवशी व कार्यालयीन वेळेत उपलब्ध होईल. कंत्राटी कामाचे दरपत्रकामध्ये प्रती किलो दराचा स्पष्टपणे उल्लेख करावा. दरपत्रक या कार्यालयाने तयार केलेल्या नमूना पत्रामध्येच भरून द्यावयाचे आहे. आपले दरपत्रक आणि संमंतीपत्र या कार्यालयात दिनांक **09.08.2023** पर्यंत किंवा त्यापुर्वी पोहोचेल असे पाठवावे. विहीत दिनांकानंतर प्राप्त होणा-या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही. लखोटयावर **"विभागाअंतर्गत ग्लिरीसिडीया झाडे तोडणे"** असा उल्लेख करावा, लिफाफा मोहोरबंद करून मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली (पांगारी विभाग) यांचे नावे पाठवावा. पोस्टाव्दारे होणा-या विलंबास हे कार्यालय जबाबदार असणार नाही. दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांचा राहील. दरपत्रकाच्या अटी व शर्ती सोबत जोडण्यात येत असून त्या ठेकेदारास बंधनकारक असतील. सदर अटी व शर्ती मान्य असल्यास दरपत्रक सादरीकरणाचे वेळी मान्यतेबाबत स्वाक्षरी करून दरपत्रकासोबत जोडण्यात याव्यात.

संचालक,
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली.

# ठेक्याबाबतच्या सर्वसाधारण अटी व शर्ती

१ ठेकेदाराने ठेका सादर करण्यापूर्वी प्रत्यक्ष प्रक्षेत्रावर कामाचे स्वरुप पाहूनच दरपत्रकामध्ये/दरपत्रक/निविदेमध्ये दर सादर करावेत.

२ ठेका मंजूरी आदेश प्राप्त होताच मंजूरी पत्रामध्ये दिलेल्या दिनांकापासून निम्नस्वाक्षरीकार/विभाग प्रमुख/प्रक्षेत्र अधिक्षक यांनी दिलेल्या सुचनांनुसार व त्यांचे देखरेखीखाली काम करावयाचे आहे.

३ तोडलेली गिलीरिसीडीया झाडांची लाकडे गाडी मध्ये भरुन वजन केल्यावर मालाची प्रती किलो दराने रक्कम भरूनच, कार्यालयीन पावती देऊन गाडी प्रक्षेत्रा बाहेर सोडण्यात येईल. रिकाम्या गाडीचे व वरलेल्या गाडीचे वजन गाडी वे ब्रिजवर नेऊन ठेकेदाराने करून घ्यावयाचे आहे.

४ प्रक्षेत्रावर दिलेल्या सुचनेनुसार करावयाची कामे विभागाच्या सोयी व गरजेनुसार ठेकेदाराने करणे बंधनकारक असेल, सुचनांचा अवमान केल्यास ठेका त्वरीत बंद केला जाईल आणि त्याबाबत ठेकेदाराच्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

५ ठेकेदाराने कामावर ठेवलेल्या कामगारांना अपघात/सर्पदंश/विंचूदंश झाल्या संबंधित कामगारावर योग्य ते उपचार करण्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील. त्यासाठी आलेल्या खर्चाची अदायगी या कार्यालयाव्दारे करण्यात येणार नाही.

६ कामाच्या कालावधीत ठेकेदार अथवा त्याच्या कामगाराकडून/मजूरांकडून प्रक्षेत्राच्या मालमत्तेचे नुकसान झाल्यास ठेकेदाराच्या ठेयकामधून संबंधित नुकसानीची किंमत वसुल करण्यात येईल आणि त्याबाबत ठेकेदारावर कायदेशिर कार्यवाही करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांना असेल.

७ ठेकेदारामार्फत पुरविण्यात आलेल्या सेवा सुविधा तसेच त्यांच्या कार्यपध्दतीचा आढावा कार्यालयामार्फत वेळोवेळी घेण्यात येईल. कार्यालयाने दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करणे ठेकेदारास बंधनकारक आहे. तसे न केल्यास ठेकेदारास देण्यात आलेल्या ठेका कोणत्याही वेळी रद्द करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांनी राखून ठेवला आहे.

८ सर्वोच्च न्यायालयाने निर्धारीत केलेल्या याचिका क्रमांक SLP-5443/90 नुसार ठेकेदारास किंवा ठेकेदाराने नेमलेल्या मजुरास/इसमास ठेका कालावधीमध्ये/ठेका कालवधी नंतर विद्यापीठ/शासकीय सेवेत कायम स्वरुपी नोकरी मिळण्यास अधिकार राहणार नाही व तसा दाखला देण्यात येणार नाही.

९ ज्या कंपनीस/संस्थेस/व्यक्तीस ठेका देण्यात येईल त्यांनी उपरोक्त अटी व शर्ती मान्य असलेबाबतचा करार लिखित स्वरुपात करणे बंधनकारक राहील. कंपनी/संस्थेतर्फे/ठेकेदारामार्फत कामावर ठेवलेल्या कर्मचाऱ्याच्या ठेवलेले कोणतेही उत्तरदायित्व शासनावर किंवा विद्यापीठावर असणार नाही.

१० झाडी/झुडपे जमिनीलगत तोडणे बंधनकारक राहील. झाडी/झुडपे जमिनीलगत तोडण्यासाठी आवश्यक असलेली यंत्रसामुग्री ही ठेकेदाराने स्वतः आणावयाची आहे व यंत्रसामुग्रीची देखभाल व दुरुस्तीची जबबदारी ठेकेदाराची राहील.

११ साफ सफाई करतेवेळी निघणारा कुजण्यायोग्य पालापाचोळा एकत्र रचून ठेवावयाचा आहे.

१२ गिरिसिडीया व्यतिरिक्त प्रक्षेत्रामध्ये असणाऱ्या उदा. साग, खैर, शिवण, आकेशिया इ. कोणत्याही झाडाची तोड करावयाची नाही. तसे निदर्शनास आल्यास आपण योग्यत्या शासकीय कार्यवाहीस पात्र रहाल.

१३. तोडलेल्या ग्लिरीसिडीया लाकडांची वहातूक करण्यासाठी वनखात्याचा आवश्यक परवाना काढण्याची जबबदारी ठेकेदाराची राहील.